भारतातील

# किंमती का वाढतात ?

(सामान्य माणसासाठी केलेले विश्लेषण)

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८६५

लेखक
एम. आर. पै

REFBK-0023190

ज्ञानविज्ञान प्रकाशन, ठाणे.

निबंध
संदर्भ
२३१९०
१५५५७
२८६५

भारतातील

# किंमती का वाढतात ?

(सामान्य माणसासाठी केलेले विश्लेषण)

२८६५
२३१९०
१५५५७
निबंध

लेखक
**एम. आर. पै.**

REFBK-0023190

ज्ञानविज्ञान प्रकाशन, ठाणे.

अर्थशास्त्र-माला : ४

भारतातील किंमती का वाढतात ?

प्रकाशक : प्रा. रमेश पानसे, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४००६०१

मुद्रक : म. बा. जोशी, बी. ए.
ज्ञानविलास प्रेस
२७, बुधवार, पुणे २.

प्रकाशन : ऑगस्ट १९७४

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

एम्. आर्. पै.
जन्म : ७ मे १९३१
शिक्षण : एम्. ए. (पोलिटिकल सायन्स) मद्रास युनिव्हर्सिटी
एम्. ए. (जर्नालिझम ) कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी, लॉस एंजेलिस
व्यवसाय : सेक्रेटरी, फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज, २३५ डॉ. डी. एन्. रोड, पो. बॉक्स ४८–A, मुंबई ४००००१

मूळ इंग्रजीवरून अनुवाद
प्रा. न. गो. काळे
भि. नि. न. महाविद्यालय, भिवंडी.

दोन रुपये

# प्रस्तावना

अर्थशास्त्राचा अभ्यास अधिक जाणतेपणाने करू इच्छिणारांसाठी विविध विषयांवरील उपयुक्त आणि दर्जेदार वाङ्मय प्रकाशित करण्याचा प्रयत्न ज्ञानविज्ञान प्रकाशनातर्फे केला जातो आणि याच हेतूने 'अर्थशास्त्र-माला' चालविण्यात येत असते. या मालेतील हे चौथे पुस्तक.

अमर्याद भाववाढ हा भारतातील आजचा सर्वात महत्वाचा आर्थिक प्रश्न असून त्याला यशस्वीपणे तोंड द्यावयाचे असेल तर सरकारने आपल्या विविध धोरणांत धिटाईने काही बदल केले पाहिजेत. शासन आपणहून हे करण्यास उत्सुक नसेल तर नागरिकांनी या प्रश्नांचे स्वरूप समजावून घेऊन, जागृत असे लोकमत तयार केले पाहिजे. अशा लोकमताच्या प्रभावानेच भाववाढ रोखणारी धोरणे अंमलात आणण्यास सरकारला भाग पाडले पाहिजे.

भाववाढीला आळा घालणे शक्य आहे. पण त्यासाठी नेमके काय केले पाहिजे हे कळण्यासाठी या पुस्तकाचे वाचन जाणीवपूर्वक करायला हवे. या पुस्तकाचे लेखक श्री. एम्. आर. पै यांनी अर्थशास्त्रीय घटनांचा एक अभ्यासक म्हणून गेली अठरा वर्षे आपल्या देशातील चलनवाढीच्या प्रश्नाचा विशेष अभ्यास केला आहे. त्यांनी लिहिलेल्या मूळ इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर भिवंडी कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. काळे यांनी केलेले असून ही पुस्तिका या दोघांचे श्रेय होय !

—प्रा. रमेश पानसे

२८६५
23960
१धघ८१
जिबध

रुपया हा काल, आज आणि उद्या यांना जोडणारा दुवा आहे. रुपयाद्वारे सर्व आर्थिक व्यवहारांचे मूल्यमापन होते; म्हणूनच या मापनाचे स्वतःचे मूल्य कायम राहिले पाहिजे. आपण दुकानात गेल्यावर प्रत्येक वेळी जर दुकानदाराने लहान लहान होणाऱ्या मोजपट्टीने मोजमाप केले, तर अर्थातच आपण आपला निषेध व्यक्त करतो. कारण मोजपट्टी ही नेहमी ठराविकच रहावी अशी आपली अपेक्षा असते. तद्वतच रुपयाची खरेदी-शक्ती सुद्धा निदान काही काळपर्यन्त तरी तीच किंवा तशीच कायम रहावी हे योग्य असे आपणास वाटते.

आपल्या देशातील नागरिकांना स्थिर मूल्य असलेले चलन किंवा पैसा उपलब्ध करून देणे हे प्रत्येक सरकारचे मूलभूत कर्तव्य शाहे. लोकशाही देशात तर ते आहेच आहे.

## १९७४ मधील रुपयाचे मूल्य

आपल्या देशात १९५६ पासून किंमतीत सातत्याने वाढ होत आलेली दिसून येते. या प्रवृत्तीस एकच अपवाद म्हणजे १९६८ सालच्या अखेरीस घाऊक किंमतीच्या निर्देशांकात झालेली मामुली घट. रुपयाच्या खरेदी-शक्तीसंबंधीचे निरनिराळे आकडे आपणास वारंवार सांगितले जातात. जसे एक रुपयाबरोबर ४२·५ पैसे, ३८ पैसे, ३६ पैसे, आणि ३० पैसे. ही आकडेवारी रुपयाच्या मूल्यासंबंधीची असून पूर्वीची निरनिराळी वर्षे पायाभूत मानून, तुलनात्मक रीतीने ती सांगितलेली आहे. जर आपणास सध्याच्या रुपयाचे खरे मूल्य मोजावयाचे असल्यास आपण त्याची १९५६ मधील रुपयाशी तुलना केली पाहिजे. कारण याच वर्षापासून सध्याच्या चलनवाढीस सुरुवात झाली आहे.

१९५६ सालाशी तुलना केल्यास १९७४ मधील रुपयाची किंमत साधारणतः केवळ २५ पैसे होईल. जगातील इतर देशांशी तुलना (रुपयाच्या मूल्यासंबंधीची) करणे इष्ट आहे काय ?

फक्त भारतातच नव्हे तर जगातील सर्वच राष्ट्रांतून किंमती वाढत आहेत असे अनेकदा प्रतिपादन करण्यात येते. हे विधान बरोबरही आहे. पण

अशी तुलना करणे मात्र बरोबर नाही. कारण ही गोष्ट खरी असली तरी भारताप्रमाणेच इतरत्रही किमती वाढत आहेत. या घटनेने भारतातील जनतेस फारसा दिलासा मिळणार नाही. अशा प्रकारचे विधान करणे म्हणजे एखाद्या डॉक्टरास, आजारी माणसावर उपचार करण्यासाठी बोलावल्यावर, त्याने आजारी माणसास, " तुझ्या आजाराची चिंता करू नकोस. हा सबंध परिसरच या आजाराने पछाडला गेला आहे. " असे म्हणण्यासारखे आहे. रोग्याची अशी अपेक्षा असते की, डॉक्टरने आजाराची चिकित्सा करून औषधासंबंधी योग्य सल्ला द्यावा. भारतासारख्या अविकसित देशातील चलनवाढीची तुलना युरोपातील, तसेच इतरत्र असलेल्या विकसित देशांतील चलनवाढीशी करणे तीन कारणांमुळे योग्य होणार नाही. ती तीन कारणे खालीलप्रमाणे–

पहिले कारण म्हणजे विकसित देशात किमतवाढ होते, पण त्याचबरोबर उत्पादनक्षमता आणि मजुरीचे दर यात होणारी वाढ त्यापेक्षाही बरीच जास्त असते. म्हणजेच एका वर्षात दहा टक्क्याने होणारी किमतवाढ पंधरा टक्क्याने वाढणाऱ्या वेतनदराने नाहीशी केली जाते. याउलट भारतात किमतवाढ होते; पण बहुसंख्य लोकांचे उत्पन्न मात्र स्थिरच रहाते. याला कुणीतरी फार चांगला दृष्टांत दिलेला आहे. त्याने असे म्हटले आहे की, " भारतातील चलनफुगवटा किंवा किमती या विजेच्या पाळण्याच्या (Lift) वेगाने गगनचुंबी इमारतीवर जातात. तर लोकांचे उत्पन्न मात्र किमतींना जिन्यावरून चालत जाऊन गाठण्याचा प्रयत्न करते."

दुसरे कारण असे की, विकसित देशात किमतवाढीचा जनतेवर होणारा परिणाम हा भारतासारख्या अविकसित देशातील जनतेवर होणाऱ्या परिणामांपेक्षा पुष्कळच कमी असतो. आपल्या देशातील बहुसंख्य लोकांत चलनवाढ पेलण्यासाठी लागणारी आर्थिक क्षमता अल्प प्रमाणात असते. उदाहरणार्थ, मध्यमवर्गीय कुटुंब मिळवलेल्या प्रत्येक रुपयातील ४५ पैसे अन्नासाठी खर्च करते. तर कामगार वर्गात हे प्रमाण ६० ते ९५ टक्के एवढे असते. याउलट अमेरिकेसारख्या देशांत अन्नावर होणारा खर्च एकूण उत्पन्नापैकी २० टक्क्याहूनही कमी असतो. तसेच भारतातील साधारणपणे अर्धी लोकसंख्या ही किमान दारिद्र्य पातळीच्याही खालचे जीवन जगते.

म्हणजेच खेड्यात त्यांचा रोजचा खर्च ५० पैशापेक्षाही कमी असतो. तर शहरी भागात तो जेमतेम ८५ पैसे एवढा असतो. म्हणूनच भारतात एक टक्का जरी किमतवाढ झाली, तरी त्यामुळे होणारा अनर्थ हा इंग्लंड किंवा अमेरिकेसारख्या देशातील १० टक्के किमतवाढीने होणाऱ्या अनर्थापेक्षा जास्त असतो.

चलनवाढीच्या संदर्भात तिसरा आणि सर्वांत महत्वाचा फरक हा वृद्धापकाळच्या तरतुदीसंबंधीचा आहे. इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत देशात सरकार आपल्या नागरिकांच्या वृद्धापकाळी त्यांचा संभाळ करते. अर्थात नागरिकही त्यासाठी कर भरून हातभार लावीत असतात. परंतु आपल्या देशात मात्र नागरिकाने एकदा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कर भरला की त्याचा त्यांना काहीही फायदा होत नाही. म्हणजेच दिलेल्या पैशाचे नागरिकांना परत दर्शन होत नाही. हेच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल, की आपणांस वृद्धापकाळासाठी स्वत:लाच तरतूद करावी लागते.

ही तरतूद अनेक प्रकारे करता येते. उदाहरणार्थ, आयुर्विमा अथवा वार्षिक बचतपत्रे घेऊन, वर्षासने ( Annuities ) घेऊन, बँकेत ठेवी ठेवून, भविष्यकालीन तरतुदीसाठी नियमित हप्ता भरून किंवा सरकारी नोकरां-प्रमाणे निवृत्तिवेतनासाठी हप्ता देऊन. होणारी चलनवाढ मात्र अशा बचतींत उलथापालथ करून बचतीचे मूळ मूल्यच नष्ट करते. आयुर्विम्या-साठी नागरिक जास्त मूल्याचा रुपया देऊन, ज्या वेळी विम्याच्या कराराची मुदत भरते, त्या वेळी ती विशिष्ट रक्कम कमी किमतीच्या (खरेदीशक्तीच्या) रुपयांत परत घेतो. दैवी आघात झाल्यास कुटुंबास मिळणारी मदत सोडल्यास आजच्या चलनवाढीच्या काळात आयुर्विमा घेणे हा गंभीर स्वरूपाचा तोटाच आहे.त्याचप्रमाणे सेवानिवृत्त लोकही चलनवाढीमुळे त्यांच्या निवृत्ति-वेतनाच्या बाबतीत पूर्ण लाभापासून वंचित होतात. उदाहरणार्थ, १९५६ साली सेवानिवृत्त झालेल्या व त्या वेळी १०० रु. निवृति-वेतन घेणाऱ्या व्यक्तीस आज तेवढ्याच रुपयाच्या नोटा मिळाल्या तरी त्यापासून खरेदी शक्तीच्या स्वरूपात मात्र त्यास निवृत्तिवेतन फक्त २५ रुपयेच मिळते, असे म्हणावे लागेल. विधवा व नादारांची काळजी ज्या विश्वस्त निधी (Trusts) मार्फत घेतली जाते, अशा संस्थांना सरकारी कर्जरोख्यात पैसे गुंतविण्याची

सक्ती केली जाते, व परिणामी त्यांनाही या पद्धतीने तोटा सहन करावा लागतो.

## किमतवाढीचे स्वरूप जास्तच गंभीर करणारी कारणे :

भारतातील किमतीत होणारी वाढ १९६२, १९६५, व १९७१ या सालात देशास तीन युद्धे खेळावी लागल्याने, तसेच १९६६-६७ आणि १९७३ सालातील दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झाली असेही सरसकट विधान केले जाते. अलिकडे तेल-पेचप्रसंगाचेही नवे कारण किमतवाढीच्या कारणांच्या यादीत समाविष्ट केले जाते. या सर्व कारणांनी किमतवाढी-संबंधीची परिस्थिती गंभीर झाली आहे हे खरे; पण ही कारणे मूलभूत स्वरूपाची कारणे खासच नाहीत. किमतवाढीची मूलभूत कारणे दुसरीच आहेत आणि ती दीर्घकालीन व अल्पकालीन अशा दोन्ही प्रकारची आहेत.

## दीर्घकालीन कारणे :

किमतवाढीचे दीर्घकालीन कारण म्हणजे १९५६ पासून म्हणजेच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीपासून चुकीच्या आर्थिक धोरणामुळे अर्थव्यवस्थेत निर्माण झालेला रचनात्मक असमतोल (Stractural im-balance) हे होय.

नियोजन म्हणजे देशात संपन्नता निर्माण करून गरीबी नाहीशी करण्यासाठी देशातील अपुऱ्या साधनसामुग्रीची जुळवाजुळव करून तिचा पर्याप्त वापर करण्याची एक प्रक्रिया आहे. नियोजनाच्या आवश्यकतेसंबंधी सर्व जगात एकवाक्यता आहे. नियोजनाचे व्यूह (Strategy) अनेक आहेत. त्यामुळे त्यासंबंधी मतभेद निर्माण होऊ शकतील. भारतात १९५६ पासून म्हणजे दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीपासून नियोजनकारांनी जो नमुना (model) वापरला आहे, त्यास केंद्रानुवर्ती सर्वसमावेशक नियोजन असे म्हणता येईल. या प्रकारच्या नियोजनाचा दृश्य परिणाम म्हणजे अर्थव्यवस्थेत रचनात्मक असमतोल निर्माण होऊन परिणामी किमतवाढ झाली. या घटनेची मीमांसा खालीलप्रमाणे करता येईल.

(१) नियोजनात अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या क्षेत्रांमधून अग्र-क्रमांची निवड करावी लागते. निवडीसंबंधीची ही क्षेत्रे म्हणजे शेती, उपभोग्य

वस्तु (उदा. कापड, सायकली), उत्पादक वस्तु (यंत्रसामग्री), अवजड उद्योग-धंदे (पोलाद, मोठी यंत्रसामुग्री), सामाजिक भांडवली खर्च, (रस्ते, टपालाच्या सेवा इत्यादी) सामाजिक सेवा (समाजविकास व इतर मूलभूत गरजा, उदा. पिण्याचे पाणी व शिक्षण) इत्यादी. उपलब्ध द्रव्यपुरवठा तुटपुंजा असल्याने तो निरनिराळ्या क्षेत्रांत अगोदर अग्रक्रम ठरविल्याप्रमाणे विभागणे आवश्यक आहे.

आर्थिक विकासाच्या नैसर्गिक अवस्थेत शेती-विकासाचा प्रथम क्रमांक लागतो आणि शेती ही आपली मूलभूत स्वरूपाची मालमत्ता आहे. जेव्हा शेती-विकास होऊन शेतकरी वर्गाच्या हातात स्वेच्छया खर्च करण्याची ताकद निर्माण होते, त्या वेळी ते कापडासारख्या उपभोग्य वस्तु खरेदी करतात. यामुळे उपभोग्य वस्तूंच्या उद्योगात गुंतवणूक होते. तसेच त्यामुळे यंत्रासारख्या उत्पादक वस्तूंना मागणी निर्माण होते व परिणामी त्यांचाही विकास होतो. या विकासाबरोबरच भारी उद्योगातील वस्तूंना मागणी निर्माण होते व या उद्योगांचाही विकास होतो. विकासाच्या या प्रत्येक अवस्थेस पुरेशा प्रमाणात बचत निर्माण होत असते व ती पुढील टप्प्यात गुंतविण्यासाठी उपयोगी पडते.

केंद्रानुवर्ती सर्वसमावेशक नियोजनात मात्र ठरविलेले अग्रक्रम अगदी विरुद्ध दिशेने असतात. प्रथम भारी उद्योगांवर भर दिला जातो. त्यानंतर उत्पादक वस्तु, उपभोग्य वस्तु, आणि शेती या क्रमाने लक्ष पुरविले जाते. अशा प्रकारे भारतात १९५६ पासूनच्या पंचवार्षिक योजनांत शेतीकडे दुर्लक्ष करण्यात आले. भारी उद्योग हे भांडवलप्रधान असल्याने, शेतीत गुंतविण्यासाठी फार कमी भांडवल उरले आणि म्हणून अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढीचा वाढत्या लोकसंख्येच्या गरजांशी मेळ बसू शकला नाही. याशिवाय पोलादासारख्या भारी उद्योगांना पूर्ण विकसित होण्यास अनेक वर्षे लागतात. पोलाद कारखान्यातील गुंतवणूक १० ते १५ वर्षांनी पोलादाचे उत्पादन देते व नंतरच त्याचे रूपांतर इमारती, यंत्रे, आणि उपभोग्य वस्तु यात होते. या मधल्या काळात पोलाद कारखान्याच्या उभारणीसाठी केलेला खर्च हा जनतेच्या हातात खरेदी-शक्तीच्या रूपात येत रहातो आणि लोक या पैशाने अन्नधान्य व उपभोग्य वस्तूंची खरेदी करतात. तथापि अशा

आवश्यक वस्तूंचे उत्पादन हे मात्र आवश्यक असलेल्या पातळीपर्यंत येऊ शकत नाही; कारण अर्थव्यवस्थेची ही क्षेत्रे भांडवल गुंतवणुकीच्या दृष्टीने भुकेली असतात.

(२) केंद्रानुवर्ती सर्वसमावेशक नियोजनाचे दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे वस्तुनिष्ठ इष्टांक (Physical targets) हे उपलब्ध असलेल्या वित्तपुरवठ्या-प्रमाणे ठरविण्याऐवजी आधी इष्टांक नक्की करून त्यानुसार गुंतवणूक केली जाते.

सरकारला नियोजनासाठी लागणारा वित्तपुरवठा हा चार मार्गांनी उपलब्ध होतो. कर (प्रत्यक्ष कर; उदा. उत्पन्न कर व अप्रत्यक्ष कर म्हणजे विक्रीकर किंवा रॉकेल, साखर, कापड इ. वरील जकात. हे कर उत्पादकाने प्रथम सरकारला भरलेले असतात आणि नंतर ते जनतेकडून वस्तूच्या विक्री, किमतीद्वारे वसूल करण्यात येतात.) जनतेकडून घेतलेली कर्जे. यात अल्प-बचतही येते. सार्वजनिक क्षेत्रास आणि सरकारी कारखान्यांना होणारा नफा आणि परकीय मदत. (म्हणजेच मित्र राष्ट्रांनी आपल्याला उपलब्ध करून दिलेली बचत).

जेव्हा वरील स्वाभाविक वित्त-पुरवठ्याचे मार्ग सरकारला नियो-जनाची उद्दिष्टे गाठण्यासाठी लागणारा पुरेसा पैसा उपलब्ध करून देत नाहीत, त्या वेळी सरकारला आणखी एका मार्गाचा अवलंब करावा लागतो. या मार्गास सामान्यपणे "तुटींचा अर्थभरणा" म्हणून ओळखले जाते.

## तुटीच्या अर्थभरण्याचे तंत्र

ज्या वेळी योजनेतील कार्यक्रमांवरील खर्च आणि इतर सरकारी खर्च उपलब्ध वित्त-पुरवठ्यापेक्षा जास्त असतो, त्या वेळी सरकार स्वतःच्या बँके-वर म्हणजेच रिझर्व बँक ऑफ इंडिया किंवा तिच्या हस्तक बँकांच्या नावा-वर चेक्स् काढते. सरकारच्या प्रचंड खर्चामुळे रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे ठेवलेला सरकारचा स्वतःचा पैसा लवकरच संपुष्टात येतो. (हा सरकारी पैसा निरनिराळे कर, सार्वजनिक कर्जे, सरकारच्या व्यापारी संस्थांचा नफा, परकीय मदत इत्यादि कारणांनी जमा झालेला असतो.) ज्या वेळी सरकारी ठेवीची रक्कम ५० कोटी रुपये या मर्यादेच्या खाली जाते, त्या वेळी रिझर्व बँक सरकारने नेहमीसाठी देऊन ठेवलेल्या सूचनांनुसार सरकारच्या ठेवीत

वाढ करते. ही वाढ सरकारने रिझर्व बँकेला दिलेल्या प्रासंगिक राजकोषपत्रांच्या (Ad Hock Treasury Bills) बदल्यात केलेली आणि तात्पुरत्या स्वरुपाची असते. राजकोषपत्र म्हणजे ९१ दिवसांनी पैसे परत करण्यासंबंधीचे वचनपत्र असते. अशा प्रासंगिक राजकोषपत्रांच्या बदल्यात रिझर्व बँक भारत सरकारच्या नावावर ठेव जमा करते. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, रिझर्व बँक नव्या चलनी नोटा छापते व त्यातून सरकारने दिलेल्या चेक्सचे पैसे देत असते. ९१ दिवसानंतर तात्पुरत्या काळासाठी निर्माण केलेल्या प्रासंगिक राजकोषपत्रांची भरपाई केली जाते व त्याच्या बदल्यात नवीन पत्रे तयार केली जातात. कारण सरकारी खर्च हा वास्तव बचतीपेक्षा बराच जास्त असतो. अशा पद्धतीने सरकार रिझर्व बँकेचा उपयोग करून जादा चलनी नोटा व्यवहारात आणते. मात्र त्या वेळी बाजारात वस्तु व सेवांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध नसतो. कारण गुंतवणूक आणि त्यापासून मिळणारे उत्पादन यात काळाचे मोठे खिडार असते.

राज्यसरकारे ही सर्वसामान्यपणे ओळखली जाणारी अनधिकृत जादा उचल ( Unauthorised overdrafts ) करून तुटीच्या अर्थभरण्याचा आश्रय घेतात. रिझर्व बँक ही राज्यसरकारांची बँक म्हणूनही कार्य करीत असते. राज्यांनाही ह्या बँकेतून अल्प काळासाठी कर्ज व मागणीदेय कर्जे घेण्याची मुभा दिली जाते. कारण राज्यांना त्यांचे उत्पन्न सबंध वर्षभर सारख्या प्रमाणात उपलब्ध होत नाही. पण याउलट राज्यांची रोख पैशाची गरज मात्र सबंध वर्षभर चालूच राहते. राज्यसरकारांना अनुभवाने असे आढळून आले आहे की, आपण मर्यादेपेक्षा जास्त उचल केली तरीही रिझर्व बँक मात्र आपल्याशी अत्यंत कनवाळूपणाने वागते. हा अनधिकृत जादा उचलीचा प्रश्न १९५० पासून प्रथमच सुरू झाला. पहिल्या योजनाकाळात राज्यांची एकूण जादा उचल जवळ जवळ १२३ कोटींची होती. दुसऱ्या योजनाकाळात अशी उचल २६८ कोटींची होती आणि १९७२–७३ या सालात ती ४२१ कोटी रुपयांवर गेली. १९७३ पासून ही जादा उचल बंद करण्याचा प्रयत्न होत आहे. रिझर्व बँकेला राज्यसरकारांचे चेक्स् न वटविण्याचा अधिकार आहे. पण जनतेचा संबंधित सरकारवरच्या विश्वासास तडा जाईल या भीतीने बँक प्रत्यक्षात अशा प्रकारची कारवाई करण्यात

कुचराई करते. वस्तुतः पाचव्या वित्तमंडळाने असे म्हटले आहे की, रिझर्व बँकेने असे चेक्स् वटविण्याचे नाकारले पाहिजे. राज्यसरकारांची अशा तऱ्हेची उचल ही बेकायदेशीर व घटनात्मक दृष्टीने अयोग्य आहे. १९७४ मध्ये रिझर्व बँकेने काही थोडया राज्यांचे चेक्स् वटविण्याचे नाकारले आणि त्यांना आपल्या खर्चाचा फेरविचार करण्यास भाग पाडले.

एकादे राज्यसरकार केंद्र सरकारचे कर्जाबाबत देणेकरी आहे आणि असे असूनही जर त्या राज्यसरकारने रिझर्व बँकेकडून अनधिकृत उचल केली, तर केंद्रसरकार ते राज्यसरकार बरखास्त करू शकते; अशी भारतीय घटनेत तरतूद आहे.

रिझर्व बँकेला दरवर्षी ३० जून रोजी आपली हिशोबाची पुस्तके पुरी करावी लागतात. त्यामुळे तिला राज्यसरकारांची जादा उचल कर्जे त्यापुढे चालू ठेवण शक्य होत नाही. अशा वेळी केंद्र सरकार राज्यसरकारांची ही कर्जविषयक जबाबदारी स्वतःवर घेते आणि त्यातून राज्यसरकारांना नवी कर्जे देण्याची प्रक्रिया सुरू होते. यासाठी केंद्रसरकार रिझर्व बँकेस प्रासंगिक राजकोषपत्रे देते. यातून अंतिमतः तुटीचा अर्थभरणाच होत असतो.

तुटीचा अर्थभरणा निर्माण करणारी तिसरी पद्धत म्हणजे सरकार-तर्फे विक्रीसाठी काढण्यात आलेली सार्वजनिक कर्जे होत. जेव्हा सरकार कर्जरोखे विक्रीस काढते, आणि ज्या वेळी त्या कर्जांना जनतेकडून पूर्ण प्रतिसाद मिळत नाही, अशा वेळी कर्जाचा न विकला गेलेला भाग रिझर्व बँक स्वतः खरेदी करते. रिझर्व बँकेकडील सरकारी कर्जरोखे (Government Securities) बँकेच्या खातेबुकात जिंदगी (Asset) म्हणून दाखविण्यात येतात. या जिंदगीच्या पाठिंब्यावर रिझर्व बँक सरकारी ठेवीत वाढ करून नवी देयता (Liability) निर्माण करते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास रिझर्व बँक ही सरकारसाठी नवीन नोटा छापते.

रिझर्व बँक ऑफ इंडियाबाबतच्या १९३४ च्या कायद्यानुसार या बँकेवर चलनविषयक स्थैर्य निर्माण करण्याचे बंधन आहे. तात्त्विक दृष्टीने पहाता रिझर्व बँक ही एक स्वायत्त संस्था आहे. तथापि प्रत्यक्षात मात्र रिझर्व बँक ही वित्तमंत्रालयाची एक शाखा बनली आहे, असे आढळून येते

आणि म्हणूनच मोठ्या प्रमाणात तुटीचा अर्थभरणा आणि त्यायोगे चौफेर वेगाने वाढणाऱ्या किंमती हे दृश्य राष्ट्रात दिसून येते.

अशा प्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा हा आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात वाढत आहे. १९५६ व १९७४ च्या दरम्यानच्या काळात जनतेजवळील पैशाचा पुरवठा २२१८ कोटी रुपयांवरून ११ हजार कोटी रुपयांवर गेला आहे. ही वाढ साधारणपणे ५ पटीने झाली आहे. परंतु याच काळात राष्ट्रीय उत्पन्न म्हणजेच वस्तु आणि सेवा यांच्या उत्पादनातील वाढ मात्र फक्त दुप्पट झाली आहे.

## सरकारी गुंतवणुकीवरील नफा :

आपले नियोजन म्हणजे वित्तपुरवठ्याचा ओघ अधिकाधिक सरकारकडे वळविणे होय. साधारणपणे राष्ट्रीय उत्पन्नाचा $\frac{3}{10}$ भाग किंवा प्रत्येक दर १०० पैशापैकी ३० पैसे हे सरकारकडे वळविले जातात. परिणामतः या पैशाच्या वापरासंबंधीचे निर्णय सरकारी अधिकारी आणि राजकारणी लोक घेतात. निर्णयशक्तीच्या केंद्रीकरणाची ही पद्धत अशा शक्तीच्या विकेंद्रीकरणापेक्षा व्यवस्थापनाच्या बाबतीत कमी कार्यक्षम आहे. या ठिकाणी निर्णय घेण्याच्या या पद्धतीच्या गुणदोषांमध्ये न शिरता अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून एकूण परिणामांचाच फक्त विचार करू.

सार्वजनिक क्षेत्रात गुंतविण्यात आलेली रक्कम ही आर्थिक दृष्ट्या उत्पादक स्वरूपाची आहे, असे अजून सिद्ध झालेले नाही आणि यामुळे चलनवाढीची परिस्थिती फारच गंभीर झालेली आहे. साध्या शब्दात हे समीकरण पुढीलप्रमाणे सांगता येईल. केंद्रसरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांत, संस्थांमध्ये एकूण ५५०० कोटी रुपये गुंतवलेले आहेत. गुंतवणूक केलेल्या ह्या संस्था केवळ उभारणीच्या अवस्थेत नसून त्या प्रत्यक्ष कार्यान्वित झालेल्या स्थितीत आहेत. या गुंतवणुकीपासून सर्वसाधारण नफा ५५० कोटी मिळणे योग्य ठरते. (कारण खाजगी उद्योगात गुंतवलेल्या भांडवलावर सुमारे १० टक्के नफा उपलब्ध होतो); पण प्रत्यक्षात सार्वजनिक क्षेत्र अनेक वर्षे तोटयात चालले असून या क्षेत्राचा प्रत्यक्ष नफा जेमतेम १८ कोटी रुपयांचा आहे.

तोटा किंवा अगदी कमी नफ्याच्या घटनेची पुनरावृत्ती राज्यसरकारांच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपयोगाच्या आणि नगरपालिकांसारख्या स्थानिक संस्थांच्या मालकीच्या संस्थांच्या बाबतीतहि झालेली आहे.

नियंत्रणे (Controls) उत्पादनास खीळ घालतात. उत्पादनावर घालण्यात आलेल्या निरनिराळ्या नियंत्रणांमुळे चलनवाढीच्या ह्या आगीचा भडका उडाला आहे. लोकांच्या संरक्षणासाठी सरकारचे नियम अस्तित्वात नसलेली अशी कोणतीहि अर्थव्यवस्था जगात असणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. १९ व्या शतकातील किमान सरकारी नियंत्रणे असलेली भांडवलशाही आज नष्ट झाली आहे. परंतु सामाजिक हितासाठी केलेले नियम आणि नियंत्रणे या दोन शब्दांत गोंधळ निर्माण होता कामा नये. नियंत्रणे ही मूलत: हुकुमशाही स्वरूपाची आहेत. त्यामुळे लोकशाही समाजव्यवस्थेत नियंत्रणे वा निर्बंध हे युद्ध, दुष्काळ, अशासारख्या आणीबाणीच्या काळातच वापरले जातात. मात्र आपल्या सर्वसमावेशक नियोजनात सरकारने नियंत्रणांचे गुंतागुंतीचे असे एक जाळेच निर्माण केले आहे. ही नियंत्रणे जशी उद्योग (Enterprises) चालू करण्यासंबंधी व त्यांच्या दैनंदिन कारभारासंबंधीची आहेत, तशीच ती किमती, मालाचे वितरण, इत्यादिसंबंधीचीही आहेत. या नियंत्रणांमुळे प्रत्येक अवस्थेत उत्पादनास खीळ बसते, आणि मग तुटवडा निर्माण होतो. तसेच विसंगत अशी परिस्थिती निर्माण होते. याचे एक उदाहरण म्हणजे अलिकडे बिस्किटे तयार करणाऱ्या एका कारखानदाराने परवान्यात नमूद केलेल्या क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन केल्याबद्दल त्याच्यावर खटला भरण्यात आला आहे.

ज्या ठिकाणी उत्पादनासाठी दिलेल्या परवान्यात नमूद केल्यापेक्षा जास्त उत्पादन केल्यामुळे उत्पादकास सरकारतर्फे अटक केली जाते, असे भारत हे बहुधा जगातील एकमेव लोकशाही राष्ट्र आहे.

थोडक्यात जास्त उत्पादन ही आजच्या काळाची गरज आहे आणि नियंत्रणामुळे जास्त उत्पादनास खीळ बसली आहे.

**किमतवाढीची अल्पकालीन कारणे :**

जलद गतीने होणाऱ्या किमतवाढीची अल्पकालीन अशी काही कारणे आहेत. ही कारणे मुख्यत: २ प्रकारची आहेत.

पहिले कारण म्हणजे अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेला काळा पैसा हे होय. या समस्येसंबंधी मोठ्या प्रमाणात गैरसमज असल्याने या प्रश्नाचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे.

**काळ्या पैशाचे अनिष्ट परिणाम :**

आर्थिक दृष्टीने काळा पैसा म्हणजे जी मिळकत वा उत्पन्न हिशेबात दाखविले जात नाही आणि म्हणून ज्यावर कर भरलेला नाही अशी मालमत्ता. काळा पैसा खालील मार्गांनी निर्माण होतो.

(अ) बेकायदेशीर कृत्ये, म्हणजे बाहेरील देशातून चोरून मालाची आयात करणे, (Smuggling) सट्टेबाजी आणि चोरी इत्यादि.

(ब) सरकारी नियंत्रणांचे उल्लंघन करून कारखान्यांतील व कचेऱ्यांतील उत्पादन सुरू ठेवणे किंवा लाच देऊन सरकारी कचेऱ्यांतील आपली कामे करवून घेणे.

(क) व्यक्तिगत करांचे दर भरमसाट असल्याने सामान्य करदात्यांस कर चुकविण्याचा मोह होतो त्याचबरोबर करमाफीची किमान मर्यादा. ( ही मर्यादा १९७४–७५ च्या अंदाजपत्रकात ६ हजार रुपयांची आहे. ) या करमाफीच्या अल्प मर्यादेमुळे करपात्र उत्पन्न असलेल्या लाखो लोकांना एक तर कर भरण्याची जाणीव नाही किंवा करवसुलीच्या जाळ्यात या करदात्यांना प्रभावी रीतीने ओढणे शक्य होत नाही.

(ड) निवडणुका, राजकारणी लोकांकडून केले जाणारे कामगार-संघटनांमधील कार्य इत्यादि राजकीय घडामोडींमुळेही काळा पैसा निर्माण होतो.

काळ्या पैशाचे रूपांतर इमारती बांधण्यात वा जवाहीर किंवा रत्नांचे दागिने खरेदी करण्यासाठी केला जातो किंवा असा पैसा व्यापारात किंवा उद्योगांत अशा पद्धतीने गुंतविला जातो की तो उघडकीस आणणे अशक्य होते. तसेच हा पैसा चैनीसाठी वापरला जातो, किंवा त्याचा वापर डोळ्यांत भरेल अशा पद्धतीने केला जातो. याचबरोबर या पैशाच्या सहाय्याने आवश्यक वस्तुंची साठेबाजी करून त्या बाबतीत सट्टेबाजी केली जाते. काळ्या पैशाचा उपयोग करून आवश्यक वस्तुंची साठेबाजी व सट्टेबाजी करण्यात येते; त्यामुळे किमतीवर दडपण येऊन त्या वाढतात.

रद्द झालेल्या नोटांच्या बदल्यात नव्याने प्रसारात आणलेल्या नोटा घ्याव्या लागतात. यासाठी प्रथम बदलीसाठी देत असलेल्या नोटा आपल्या कायदेशीर मार्गाने मिळवलेल्या उत्पन्नातील आहेत, व सर्व करांचा भरणा केल्यानंतर त्या शिल्लक राहिलेल्या आहेत अशा प्रकारचे सरकारी अधिकाऱ्यांचे समाधान करावे लागेल. तात्त्विक दृष्टीने काळा पैसा बदलून घेतला जाणार नाही. कारण अशा पैशासंबंधी समाधानकारक खुलासा करता येणे शक्य नाही. अशा प्रकारे काळ्या पैशाची व्यवहारातून हकालपट्टी होईल व जेव्हा पैशाची संख्या घटेल, त्या वेळी किंमतीही खाली येऊ लागतील.

नोटा चलनातून काढून टाकण्याचे धोरण भारतात परिणामकारक ठरेल किंवा कसे या प्रश्नाचा विचार करण्यासाठी प्रथम आपल्या चलनपद्धतीच्या रचनेचा अभ्यास होणे आवश्यक आहे. आपल्या चलनापैकी ८० टक्के चलन हे १० रुपयांच्या व १०० रुपयांच्या नोटांच्या स्वरूपात आहे. दीड टक्का चलन ह्या १ हजार, ५ हजार व १० हजार रुपयांच्या नोटांच्या स्वरूपात आहे. उरलेल्या नोटा ५ रु., २ रु. व १ रुपयाच्या (नोटा व नाणी) आहेत.

एक रुपयाची नोट ही एक रुपयाच्या नाण्यासारखी मानली जाते. नुकत्याच वीस रुपयांच्या नोटा वापरात आणल्या आहेत. या नोटांपैकी दहाहजार आणि पाच हजार रुपयांच्या नोटा आंतर बँक (बँका-बँकांमधील) व्यवहारासाठी वापरल्या जातात. एक हजार रुपयांच्या नोटांची जमाखर्चात नोंद केली जाते.काळा पैसा धारकांच्यात १०० रुपयांच्या नोटा प्रिय आहेत; पण नोटा रद्द करण्यासंबंधी वारंवार होणाऱ्या भोंगळ चर्चेमुळे १० रुपयांच्या नोटासुद्धा लपविलेल्या उत्पन्नाचा साठा करण्यासाठी वापरल्या जातात. म्हणून हा उपाय परिणामकारक होण्यासाठी दहा रुपयांच्या व त्यावरील अशा सर्वच चलनी नोटा रद्द करणे आवश्यक ठरेल. याने वापरातील चलनापैकी जवळजवळ ८५ टक्के चलन बाहेर काढल्यासारखे होईल; पण नोटांच्या अदलाबदलीची गुंतागुंतीची पद्धत लक्षात घेता, नोटांच्या बदलासाठी आज उपलब्ध असलेल्या सोयी गरजेच्या मानाने फारच अपुऱ्या वाटतात. सध्या एकूण ८० हजार राजकोष-कचेऱ्या (Treasury Offices) आणि बँकांच्या शाखा उपलब्ध आहेत. तसेच सुमारे एक लक्ष बारा हजार पोस्ट-

कचेऱ्या आहेत. या सर्वांना या प्रश्नाला तोंड देता येणे शक्य होणार नाही. त्याचबरोबर एकूण चलनाचा साठा आर्थिक व्यवहारासाठी कसाबसा ७ आठवडे पुरेल एवढा आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या संघटित विभागाच्या हालचालींना खीळ बसेल. म्हणजेच त्या विभागाची गळचेपी होईल.

## भारतातील पूर्वीचे नोटा रद्द करण्याचे धोरण कितपत यशस्वी झाले ?

१९४६ मध्ये रिझर्व बँकेचा सल्ला झुगारून मोठ्या रकमेच्या नोटा रद्द करण्यात आल्या होत्या. त्या वेळचे रिझर्व बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर डॉ. सी. डी. देशमुख यांनी पुढील काळात ही गोष्ट स्पष्ट केली की, हा उपाय यशस्वी ठरला नाही. रद्द केलेल्या १४४ कोटी रुपयांच्या नोटांपैकी फक्त ९ कोटी रुपयांच्या नोटा अदलाबदलीसाठी हजर करण्यात आल्या नाहीत आणि हेसुद्धा ही युक्ती पूर्वसूचनेशिवाय करण्यात आली होती तरी. अलीकडे नावाजलेले अर्थतज्ञ प्रा. सी. एन्. वकील यांच्या आधिपत्याखाली सुमारे १४० अर्थतज्ञांनी आपल्या चलनवाढीसंबंधीच्या निवेदनात अल्पप्रमाणात नोटा रद्द करण्यासंबंधी सूचना केली आहे. प्रत्यक्षात मात्र भारतासारख्या देशात, जेथे अशिक्षितपणा मोठ्या प्रमाणात आहे आणि बँकिंगच्या सवयी अल्प प्रमाणात आहेत, तेथे अशा प्रकारची योजना राबविणे कठीण आहे.

नोटा रद्द करण्याच्या कोणत्याही पद्धतीमुळे जनतेचा मात्र देशातील चलनावरील विश्वास डळमळू लागेल. यामुळे अर्थव्यवस्था अधिकाधिक चलनाधिष्ठित करण्याच्या ( विनिमयासाठी पैशाचा वापर वाढविण्याच्या ) कार्यास खीळ बसेल. जर सुमारे १० वर्षापूर्वी सरकारने सर्व सुरक्षित पेट्या (Safe deposit lockers) ताब्यात घेतल्या असत्या व १०० रुपयांच्या व त्यावरील चलनी नोटा रद्द केल्या असत्या तर फायदेशीर परिणाम दिसून आले असते. त्या वेळी ही एक व्यावहारिक उपाययोजना होती आणि त्यामुळे नुसत्या किंमती खाली आल्या असत्या, एवढेच नव्हे तर काळा पैसा-धारकांनाही शिक्षा झाली असती.

## दुसरा उपाय–नियंत्रणें : योग्य आणि अयोग्य

किमती खाली आणण्यासाठी सुचविण्यात येणारा दुसरा उपाय म्हणजे आवश्यक वस्तुंवर प्रत्यक्ष नियंत्रणे लादणे हा होय. नियंत्रणासंबंधीचा आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता अशा प्रकारची जादा नियंत्रणे लादण्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येणार नाही. सध्याच्या तुटीच्या परिस्थितीस योग्य उत्तर म्हणजे जादा उत्पादन हे आहे; जादा नियंत्रणे हे नव्हे. अशा नियंत्रणांमुळे फक्त जास्त तुटवडा निर्माण होईल आणि त्याचबरोबर जास्त काळा पैसा निर्माण होईल. अशा प्रकारे चलनफुगवटयास आणखीच जोर चढेल. सीमेंटच्या उदाहरणावरून हे स्पष्ट करता येईल. उत्पादकाला सीमेंटच्या एका पिशवीमागे सुमारे १३ रुपये मिळतात. तर ग्राहकाला काळ्या बाजारात त्यासाठीं २५ रुपयापासून ४० रुपयापर्यंत ( तो देशाच्या ज्या भागात रहात असेल त्याप्रमाणे ) कोणतीही किंमत द्यावी लागते. हा १२ ते २७ रुपयापर्यंतचा फरक नैतिकतेची तमा न बाळगणारा मध्यस्थ, लाचखाऊ अधिकारी आणि राजकारणी यांना मिळतो आणि तो त्यांच्या हातात काळा पैसा म्हणून रहातो. हेच जर सीमेंटचा खुला व्यापार असता तर उत्पादकांना हा फरक उपलब्ध झाला असता; म्हणजेच यापैकी ५० टक्के पैसा सरकारला कराच्या रूपाने मिळाला असता आणि उरलेला पैसा उत्पादनवाढीसाठी गुंतविला गेला असता. या अनुषंगाने जास्त प्रमाणात सीमेंट उपलब्ध झाल्यामुळे किंमती खाली आल्या असत्या आणि अशा प्रकारे ग्राहकांचा फायदा झाला असता.

## तिसरा उपाय–राष्ट्रीयीकरण : योग्य आणि अयोग्य

किमती खाली आणण्यासाठी सुचविण्यात येणारा तिसरा उपाय म्हणजे आणखी जास्त प्रमाणात उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करणे हा होय. आतापर्यंतच्या अनुभवाच्या आधाराने या उपायाबाबतीत आपण अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे. या बाबतीब अगदी अलिकडचे उदाहरण कोळसा उद्योगाचे देता येईल. या उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणानंतर कोळशाची तूट निर्माण झाली, त्याचा दर्जा ( Quality ) खालावला आणि कोळशाच्या किमती जवळ जवळ २५ टक्क्यांनी वाढल्या. कोळशाच्या पुरवठ्याची

स्थितीही इतकी बिघडली की, ज्या कारखान्यात पोलाद, सिमेंट इत्यादि महत्वाच्या वस्तू बनतात, असे कारखाने बंद करावे लागले. औष्णिक विद्युत्-केंद्रे की ज्यांचेकडून अनेक उद्योगांना वीजपुरवठा होतो ती केंद्रे कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे बंद होण्याच्या धोक्यात आहेत. अर्थव्यवस्थेला विनाशकारी असे यापेक्षा अधिक काय असू शकेल ?

अलिकडेच रशियामधील अर्थतज्ञ आर. युलानोव्हास्की यांनी सुद्धा असे स्पष्ट केले आहे की, सरकारच्या आर्थिक कमकुवतपणामुळे खाजगी क्षेत्रांची मदत निरनिराळ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी घेतलीच पाहिजे. काही देशांत खाजगी क्षेत्रांचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यात किरकोळ व्यापार, सार्वजनिक अन्नपुरवठा, वाहतूक आणि इतर सेवा यांचा समावेश होतो. परंतु यामुळे वस्तूंचा तुटवडा, किमतीत वाढ, काळ्या बाजाराचा उदय आणि बेकायदेशीर मालाची आयात इत्यादी गोष्टी निर्माण झाल्या आहेत.

## चवथा उपाय-ग्राहकांचा प्रतिकार किंवा विरोध

ग्राहकांतर्फे होणारा विरोध वा प्रतिकार हा किमती खाली आणण्याचा एक परिणामकारक उपाय म्हणून सुचविला जातो. हा उपाय सर्वसाधारण चलनवाढीच्या परिस्थितीत म्हणजे सर्वत्र असलेल्या तुटवड्याच्या परिस्थितीत परिणामकारक होऊ शकत नाही. हा उपाय म्हणजे एकाद्या माणसास नदी पुराने दुथडी वहात असताना 'पोहोण्यास शीक' असे सांगण्यासारखे आहे.

ग्राहकांतर्फे होणारा असहकार हा जवळ जवळ परिणामशून्य आहे. कारण लोकांना निवडीसाठी पर्यायी वस्तू उपलब्ध नाहीत; शिवाय भारतातील ग्राहकांची चळवळ ही अजूनही बाल्यावस्थेतच आहे आणि तिची जोपासना परिणामकारक रीतीने करणे कठीण आहे.

## पाचवा उपाय–साम्यवादी विचारसरणी :

साम्यवादी देशात चलनवाढ नाही, असे म्हणून किमतवाढीच्या संदर्भात हा एकांगी नि जहाल उपाय कधी कधी सुचविला जातो. हा उपाय

म्हणजे सरकारने अर्थव्यवस्थेवर संपूर्ण नियंत्रण ठेवावे. असे केल्याने साम्य-वादी देशांप्रमाणे परिस्थिती भारतात निर्माण होईल. परंतु साम्यवादी देशात चलनवाढ नाही, हे विधान मुळातच चुकीचे आहे.

साम्यवादी अर्थव्यवस्थेचे वर्णन 'दडवून ठेवलेला चलनफुगवटा' असे करता येईल. अशा चलनफुगवटयाचे दुःख साम्यवादी अर्थव्यवस्था भोगीत असतात. याचा अर्थ त्या अर्थव्यवस्थांतून वस्तूंचा तुटवडा, त्यासाठी लोकांच्या लांब लांब रांगा आणि बँकांत जमा करण्यात आलेला पैसा असा असतो. मोठया ठेवी जमण्याचे कारण म्हणजे लोकांना विकत घेण्यासाठी आवश्यक वस्तूंचा किंवा चांगल्या प्रतीच्या वस्तूंचा आवश्यक तेवढा पुरवठा उपलब्ध नसतो. अन्न व उपभोग्य वस्तूंचा तुटवडा हे साम्यवादी अर्थव्यव-स्थेचे एक विशेष लक्षण आहे. कारण अशा अर्थव्यवस्थेत गुंतवणुकीच्या विभागणीत अवजड उद्योगांवर जास्त लोभ दाखविला जातो.

अशा अर्थव्यवस्थेतील राहाणीमानाचे निर्देशांक हे किंमतपातळी समजा-वून घेण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरत नाहीत. याला कारण म्हणजे अशा अर्थव्यवस्थेत किंमती या केंद्रीय योजनाकार ठरवून देतात व राहाणीमानाचे निर्देशांक तयार करताना ह्या सरकारतर्फे ठरवून दिलेल्या किंमती ग्राह्य मानतात. शिवाय बाजारात वस्तु उपलब्ध आहे किंवा नाही याचा विचारही केला जात नाही.

वरील परिस्थिती आणखी एका कारणामुळे जास्तच गुंतागुंतीची होते; ते म्हणजे साम्यवादी अर्थव्यवस्थेत दुहेरी किंमतीची पद्धत अस्तित्वात असते. काही अग्रहक्क असलेले लोक जे साम्यवादी पक्षाचे सभासद असतात, अशांच्या हातात राजकीय सत्तेची मक्तेदारी असते. या लोकांना सर्व स्थानिक वस्तु आणि त्याचबरोबर आयात केलेल्या वस्तु, त्यांच्यासाठीच फक्त चालविण्यात येणाऱ्या खास दुकानांतून विकत घेण्याचा अधिकार असतो. सर्वसामान्य लोकांना या दुकानांची दारे खुली नसतात.

## चलनवाढ रोखण्यासाठी वास्तववादी उपाय :

भारतातील चलनवाढ रोखण्यासाठी वास्तववादी असे कोणते उपाय आहेत ? या समस्येला ताबडतोबीचा असा एकहि उपाय नाही. अनेक

धोरणात्मक उपाय एकत्रित करून त्याची अंमलबजावणी केल्यास मात्र चलनवाढ रोखता येईल आणि अर्थव्यवस्थेस पुढे ढकलण्यासाठीं प्रचंड असा रेटा देणे शक्य होईल. यापैकी काही उपाय तावडतोबीचे आहेत आणि इतर काही दीर्घकालीन स्वरूपाचे आहेत.

**हे उपाय खालीलप्रमाणे आहेत :**

(१) गुंतवणुकीच्या अग्रहक्कासंबंधी धोरणात्मक बदल घडवून आणणे. यात शेती साधनसामुग्री पुरविणारे उद्योगधंदे म्हणजे खते वगैरे किंवा शेतीमालावर आधारित असे उद्योगधंदे. उदा. वनस्पती इत्यादि आणि त्याबरोबर शेतीशी संबंधित असे उद्योग. उदा. कुक्कुटपालन वगैरे यांचा समावेश होतो. या सर्वांकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक ठरते. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेची गुरुकिल्ली आहे आणि ज्या वेळी शेतीचा पाया भक्कम केला जाईल, त्याच वेळी बळकट आणि किफायतशीर असा औद्योगिक विकास घडविणे शक्य होईल.

शेतीमधील गुंतवणूक प्रत्यक्षात खालीलप्रमाणे असू शकेल. खेड्यांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा व्हावा म्हणून रस्ते तयार करण्यासाठी तरतूद करणे, आपल्या देशातील दर तीन खेड्यांपैकी एका खेड्यास अशा प्रकारचा खेड्यात शिरकाव करण्याचा रस्ताच उपलब्ध नाही. ही गोष्ट लक्षात घेतली तर हे काम अत्यावश्यक स्वरूपाचे आहे असे म्हणता येईल. यानंतरची गुंतवणूक ही खते व कीटकनाशके तयार करण्यासाठी करता येईल. त्याचप्रमाणे धान्य साठवणे आणि विक्री यासाठी सोयी उपलब्ध करणे, तसेच पाटबंधाऱ्यांच्या सोयी व त्यातही जेथे शक्य असेल तेथे लहान लहान पाटबंधारे बांधणे; याशिवाय शेतीविषयक तंत्रज्ञानाचा शेतकरी वर्गात प्रचार करणे, शेतीस कर्जपुरवठा करणे, शेतमालाच्या किंमती स्थिर राखणे, विशेषतः किंमतींना संरक्षण देऊन त्याची घोषणा पुष्कळ अगोदर करणे वगैरे प्रकारच्या निरनिराळ्या क्षेत्रांत पैशाची गुंतवणूक करणे शक्य आहे.

अन्नधान्याच्या विक्री व्यवस्थेत कोणत्याही प्रकारची मक्तेदारी नाहीशी करणे इष्ट ठरेल. राज्यसरकार, सहकारी संस्था, भारतीय अन्नमहामंडळ आणि खाजगी व्यापारी या सर्वांना एकमेकांशी स्पर्धा करण्याची मुभा

असावी. सरकारने अन्नधान्याचे राखीव साठे ज्या वर्षात उत्पादन मुबलक असेल त्या वर्षात करावे. यासाठी शेतकरी वर्गास किमतीच्या बाबतीत संरक्षण द्यावे. असे अन्नधान्याचे साठे सार्वजनिक वाटपासाठी वापरावे व अन्नधान्याची तूट असेल अशा वर्षात गरिबांना धान्याचे वाटप करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग करावा. वीस शतकातील निरनिराळ्या देशातील अन्नधान्याच्या राज्य व्यापाराचा अनुभव असे दर्शवितो की, वर सांगितलेले अन्नधोरण हेच शेवटी परिणामकारक असे आहे. कारण यात सामाजिक न्यायाचे ध्येय आणि अर्थशास्त्राचे नियम या दोहोंची सांगड घातली जाते.

## २. सार्वजनिक गुंतवणुकीची सुव्यवस्था (Consolidation)

केंद्रसरकार, राज्यसरकारे आणि स्थानिक पातळीवर नगरपालिकांनी फार मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक पैसा व्यापार, उद्योगधंदे, आणि सार्वजनिक सोयी या क्षेत्रात ओतला आहे. यापुढे या क्षेत्रांतून अधिक पैसा गुंतविण्यापूर्वी या अगोदर गुंतविलेल्या पैशावर निदान १० टक्के नफा होईल अशा रीतीने त्या गुंतवणुकीत क्षमता निर्माण केली पाहिजे. यासाठी एक उदाहरण घेता येईल. राज्य वीज मंडळातून आजपावेतो ७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त पैशांची गुंतवणूक झालेली आहे. पण जर त्यांच्या कर्जाचे व त्यांच्या परतफेडीचे हिशेब विचारात घेतले तर असे आढळून येईल की, एकही राज्य वीज मंडळ नफ्यात चालत नाही. यापैकी काही मंडळांनी तर आपले ताळेबंद वर्षानुवर्षे प्रसिद्धच केले नाहीत. या मंडळाच्या वीज प्रक्षेपणातील तोटा २७ टक्क्यापर्यंत आहे. सहाव्या वित्तमंडळाने असे म्हटले आहे की, हा तोटा १५ टक्क्यापेक्षा जास्त असू नये. पाश्चात्य देशात वीज प्रक्षेपणातील तोटा ७ ते १२ टक्क्यापर्यंत आहे. आपल्या देशात प्रक्षेपणातील तोटा १५ टक्क्यापर्यंत जरी आणला तरी प्रत्येक बचत केलेल्या एका टक्क्यामुळे राज्यसरकारांचा महसूल ५ कोटी रुपयांनी वाढेल. तसेच उद्योगधंद्यांनाही जास्त वीज उपलब्ध होईल आणि वीज मंडळांना कमी प्रमाणात आर्थिक तोटा सहन करावा लागेल. प्रक्षेपणातील तोटा कमी करण्यासाठी आवश्यक कौशल्य बाहेरून आयात करण्याची गरज नाही. यासाठी प्रक्षेपणाच्या पद्धतीत अधिक कार्यक्षम व्यवस्थापन आणणे पुरेसे आहे.

. सार्वजनिक क्षेत्राची स्थिती बळकट करण्याचे काही धोरणात्मक उपाय पुढीलप्रमाणे आहेत–

या क्षेत्राचे ४९ टक्के भाग भांडवल जनतेला विकले जावे. शिवाय सार्वजनिक क्षेत्रातील हे भाग शेअरबाजारात नोंदविले जावेत. यामुळे सरकारला या क्षेत्रावर पुरेसे नियंत्रण प्राप्त होऊन, शिवाय या क्षेत्रातील प्रकल्पात गुंतलेला २५ शे कोटी रुपयाहून जास्त पैसा मोकळा होईल. हे भाग शेअर बाजारात नोंदविलेले असल्याने त्यावरून सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचे आर्थिक आरोग्य स्पष्ट होईल. या संस्थांचे काही भाग भांडवल त्यातील कामगारांना विकून ह्या संस्थांना स्वायत्त संस्थांचे स्वरूप दिले जावे. सार्वजनिक क्षेत्रातील या संस्थांना सरकारकडून आपुलकीची वागणूक मिळणे योग्य नाही. या संस्थांनी खाजगी व सहकारी क्षेत्रातील इतर संस्थांशी स्पर्धा करावी. तसेच या संस्थांना सरकारतर्फे कर्जपुरवठा न होता तो इतर वित्तमंडळांकडून करण्यात यावा.

**३. नियोजन आणि द्रव्यपुरवठा :**

आपल्या देशातील नियोजनाची प्रक्रिया ही निश्चितपणे उपलब्ध असलेल्या द्रव्यपुरवठ्याच्या आटोक्यातील असावी. यापुढे केंद्र वा राज्य सरकारांची तुटीची अंदाजपत्रके उपयोगी नाहीत. किमतवाढीच्या अर्थव्यवस्थेतील मोठ्या प्रमाणावरील गुंतवणुकीपेक्षा जर रुपयाचे मूल्य स्थिर राहिले, तर अल्पप्रमाणातील गुंतवणूक हीसुद्धा जास्त उत्पादन देऊ शकेल.

**४. आर्थिक विकासाचा पाया : बचत :**

देशाच्या आर्थिक विकासाचा पाया म्हणजे जनतेमध्ये असलेली बचत करण्याची सवय ही होय. सुदैवाने भारतीय जनतेचा स्वाभाविक कल बचत करण्यास अनुकूल असा आहे. जनतेला बचतीसाठी योग्य प्रकारची आकर्षणे निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी बँकेतील ठेवी व सरकारी कर्जरोख्यांवरील व्याजाचा दर बऱ्याच प्रमाणात वाढविणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या प्रयोगाने दक्षिण कोरिया या देशात बचतीत प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे.

**५. चलनविषयक दुरुस्ती :**

बचतीचा वेग कायम ठेवण्याचा एक महत्वाचा उपाय म्हणजे चलनविषयक धोरणात सुधारणा करणे. ब्राझील देशात या दृष्टीने करण्यात आलेला प्रयोग हा जगातील सर्व देशांना अभ्यासाचा एक विषय झाला आहे. चलनविषयक सुधारणा म्हणजे बँकेतील ठेवी, आयुर्विमा, सरकारची कर्जे इत्यादींची परतफेड करताना चलनाची खरोखरीची खरेदी–शक्ति लक्षात घेऊन त्या प्रमाणात परतफेड करणे. ब्राझीलमध्ये या प्रयोगाची ज्या वेळी सुरवात करण्यात आली, त्या वेळी जागतिक बँकेचे व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे तज्ञ या प्रयोगाच्या यशाबद्दल साशंक होते. पण हा प्रयोग चलनवाढ रोखण्याच्या दृष्टीने फारच प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे.

**६. तुटीच्या अर्थभरण्यास संसदेची मान्यता :**

खरे सांगावयाचे झाल्यास तुटीचा अर्थभरणा म्हणजे जनतेच्या रोख पैशावर लावलेला कर होय. तुटीच्या अर्थभरण्याने पैशाच्या पुरवठ्यात झालेली वाढ एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जनता सामावून घेऊ शकते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास प्रा. मिल्टन फ्रीडमन यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे तुटीचा अर्थभरणा म्हणज जनतेने सरकारला कर्ज म्हणून शून्य टक्का व्याजाने दिलेली रक्कम होय. एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त वाढवण्यात आलेला पैसा अर्थव्यवस्थेत सामावून घेतला जात नाही आणि म्हणून हा पैसा म्हणजे मुख्यतः ठराविक उत्पन्न गटातील लोकांना आपल्या रोख पैशावर कराच्या बोजासारखा वाटतो. कारण ह्या लोकांच्या जवळील रुपयाची खरेदीशक्ती त्यामुळे सुप्तपणे कमी होते.

आपल्या घटनेनुसार करवृद्धी करण्याचे अधिकार फक्त लोकसभेलाच देण्यात आलेले आहेत. निदान सद्यःपरिस्थितीत जर सरकारला राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त प्रमाणात पैशाच्या पुरवठ्यात वाढ करावयाची असेल, तर त्याने लोकसभेची मान्यता घेणे अत्यावश्यक आहे. काही देशांच्या अनुभवांच्या आधारे या संबंधात अशाच प्रकारची एक सूचना रिझर्व बँक ऑफ इंडियाचे भूतपूर्व गव्हर्नर श्री. एच्. व्ही. आर्. अय्यंगार यांनीही केलेली आहे.

### ७. लहान आकाराची मंत्रिमंडळे :

सरकारी खर्च कमी करून व आर्थिक साधनांच्या उपयोगात सुधारणा करणेही आवश्यक आहे. या दृष्टीने योग्य सुरुवात म्हणून प्रथम अर्थव्यवस्थेत योग्य प्रकारचे मानसिक वातावरण निर्माण केले पाहिजे. ह्या दृष्टीने केंद्र व निरनिराळ्या राज्यांतील मंत्रिमंडळाचे आकार लहान करणे इष्ट होईल. उदा. ६१ मंत्र्यांचे केंद्रिय मंत्रिमंडळ ही चैन भारतासारख्या गरीब देशास परवडणारी नाही. ८ ते १० जणांचे केंद्रीय मंत्रिमंडळ पुरेसे आहे. त्याचप्रमाणे राज्यात ३० ते ५० जणांची मंत्रिमंडळे म्हणजे जनतेवर एक प्रकारचा आर्थिक भूर्दंड आहे. या मंत्रिमंडळाचा आकार कमी करून ६ ते ८ जणांचो लहान मंत्रिमंडळे स्थापन करावीत. जर जास्त लोकांना ही जबाबदारी अंगावर घेण्याची इच्छा असेल तर मंत्रिमंडळात वेळोवेळी खांदेपालट घडवून आणावेत.

### ८. करकपात :

उत्पादनात वाढ करण्यासाठी आवश्यकता आहे ती वस्तुनिष्ठ उपायांची. हे उपाय दोन प्रकारचे आहेत. (अ) व्यक्ती व कंपन्या यांच्यावरील कराच्या पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ करावी. त्याचबरोबर गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्याच्या किंवा नफ्याच्या पुनर्गुंतवणुकीच्या योजना तयार केल्या जाव्यात. असे केल्याने जनतेच्या हाती असलेल्या वाढत्या खरेदी शक्तीचा उपयोग उत्पादक कामासाठी करवून घेता येईल. १९७४–७५ च्या अंदाजपत्रकात व्यक्तीच्या उत्पन्न करात ९ टक्क्याहून ७७ टक्क्यापर्यंत करण्यात आलेली कपात हे योग्य दिशेने उचललेले पाऊल आहे असे म्हणता येईल. यालाच जोडून आणखी एक गोष्ट केली पाहिजे; ती म्हणजे उत्पन्न करातील माफीची किमान मर्यादा ही आजच्या ६ हजार रुपयावरून १५ हजार रुपयांवर नेली पाहिजे. मी असे म्हणतो त्याला आर्थिक आधार आहे. एक म्हणजे भारतीय रुपयाचे मूल्य गेल्या काही वर्षात बऱ्याच प्रमाणात घसरले आहे आणि जरी १५ हजार रुपयांची मर्यादा ठेवली, तरी ती मर्यादासुद्धा दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच्या करमाफीच्या मर्यादेपेक्षा कमीच असेल. दुसरे म्हणजे स्थिर उत्पन्न गटातील लोकांच्या हातातील पैशाची उधळपट्टी न होता तो पैसा त्यांच्या मुलांना चांगले जीवन म्हणजेच जास्त दूध, अन्न

आणि शिक्षण देण्यासाठी उपयोगी पडेल. तिसरे म्हणजे प्राप्तीकर यंत्रणेचा व्यवस्थापीय खर्च कमी होऊन या यंत्रणेस करचुकवेगिरी करणाऱ्यांकडे आपले लक्ष केंद्रित करता येईल. चौथे आणि शेवटचे असे की, अल्प उत्पन्न पातळीवरील कर गोळा करण्याचा खर्च हा त्या करापासून प्रत्यक्ष गोळा होणाऱ्या रकमेपेक्षा बराच जास्त असतो. वरील उपायांनी सहकारी महसुलावर अयोग्य परिणाम न होता त्यात वाढच होईल. कराचे दर कमी असल्यास त्यामुळे आर्थिक विकासास चालना मिळेल आणि अशा प्रकारे परिणामी सरकारला जास्त महसूल मिळू शकतो. जपान, अमेरिका व इतरत्र केलेल्या करकपातीच्या प्रयोगावरून हे स्पष्ट झाले आहे.

**९. नियमन हवे, पण नियंत्रण नको :**

नियंत्रणाची जागा योग्य प्रकारच्या नियमांनी घेतली पाहिजे. जर किमतीवरील नियंत्रणे हटविली तर सरकारी तिजोरीचा फायदा होईल, काळा पैसा नाहीसा होईल, उत्पादन वाढेल आणि किमती खाली येतील.

चलनवाढ म्हणजे केवळ तात्पुरत्या स्वरूपाचा आर्थिक आजार असे म्हणून आपणास त्याकडे सहजपणे दुर्लक्ष करता येणार नाही. संघटित समाज आणि मुख्यत: लोकशाही समाज चलनवाढीच्या वेगाने कसा भरडला जातो याची इतिहासात पुष्कळ उदाहरणे आहेत. विसाव्या शतकात जर्मनीचे वेईमार गणराज्य, कोमीहांग चिन, सोकार्नोच्या कारकीर्दीतील इंडोनेशिया, दक्षिण कोरिया आणि फिलिपाइन्स ही सर्व उदाहरणे लोकशाही समाज हा चलन फुगवट्याने हुकमशाहीत कसा लोटला गेला याचीच आहेत. याशिवाय चलनवाढ ही प्रत्यक्षपणे सामाजिक न्यायाला विरोध करते. कारण ती प्रामाणिक अशा ठराविक उत्पन्नगटांना शिक्षा करीत असते आणि त्याच वेळी लोकांना व काळा पैसा धारकांना मात्र फायदा प्राप्त करून देते. चलनवाढ रोखणे शक्य आहे. ती सहन केलीच पाहिजे असे नाही. यासाठी जे केले पाहिजे ते हे की सुशिक्षित नागरिकांनी चलनवाढीच्या गंभीर धोक्याबाबत नेहमी सावध राहिले पाहिजे. तसेच सरकारने आर्थिक धोरणांना व्यवहारचातुर्याची जोड दिली पाहिजे.

□ □ □

REFBK-0023190

# अर्थशास्त्र माला योजना

## दहा रुपये वर्गणीत महत्त्वाची सात पुस्तके !

* केवळ १० रुपये वर्गणी भरून येत्या वर्षभरात
  प्रसिद्ध होणारे खालील वाङ्मय आपण प्राप्त करू शकाल :

भारतातील दुष्काळ व दुष्काळ–धोरण : भ० ग० बापट

भारतातील केंद्र–राज्य वित्तसंबंध : भ० ग० बापट / रमेश पानसे

किंमती का वाढतात ? : एम्० आर्० पै

भारतातील परकी भांडवल : चंद्रकांत केळकर

चलनफुगवटा व आर्थिक विकास : एच्० व्ही० आर्० अय्यंगार

बेकारीची समस्या व अर्थव्यवस्थेतील असमतोल : वि० म० दांडेकर

भारतीय अर्थव्यवस्था : काही आकडेवारी : रमेश पानसे / पु. के. मोकाशी

* सुरुवातीच्या वर्गणीदारांस 'सोव्हिएत शेती नियोजनामागील प्रेरणा' ही स० ह० देशपांडे यांची पुस्तिका विनामूल्य देण्यात येईल.

* वर्गणी पोचताच पहिल्या तीन पुस्तिका पाठविल्या जातील. इतर पुस्तिका प्रसिद्ध होताच पाठविण्यात येतील.

* वर्गणी पाठविताना आपले नाव, पत्ता व कॉलेज सुवाच्य अक्षरात कळवावे.

  वर्गणी मनीऑर्डरने खालील पत्त्याव पाठवावी.

**ज्ञानविज्ञान प्रकाशन**
**'सोनोरी', ३६ चरई,**
**ठाणे, ४०० ६०१.**